असा. क्र. ३४ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, जुलै १६, २००४ / आषाढ २५, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९.**——महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश . . ३०९–३११

**नगरविकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जुलै २००४.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XIX OF 2004.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

२००४ चा महा. अध्या. २. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक २८ जानेवारी २००४ रोजी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २००४ हा प्रख्यापित केला होता ;



[ **किंमत** : रुपये ९.०० ]

**आणि ज्याअर्थी,** १५ मार्च २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यानंतर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २००४ (सन २००४ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १), हे दिनांक १७ मार्च २००४ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये मांडण्यात आले होते. तथापि, राज्य विधानमंडळाच्या उक्त सत्राची त्याच दिवशी समाप्ती झाल्याने, उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात आणण्याचे चालू ठेवणे इष्ट वाटले आणि म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, १२ मे २००४ रोजी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४ (सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९) प्रख्यापित केला होता ; सन २००४ चा महा. अध्या. ९.

**आणि ज्याअर्थी,** २४ मे २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यानंतर, उक्त सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात आला होता, आणि उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक, २००४ (सन २००४ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८), दिनांक २७ मे २००४ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये मांडण्यात आले होते. उक्त विधेयक विधानपरिषदेकडून ९ जून २००४ रोजी संमत करण्यात आले परंतु राज्य विधानमंडळाच्या अधिवेशनाची ११ जून २००४ रोजी सत्रसमाप्ती झाल्यामुळे ते विधानसभेकडून संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरण्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांच्या समाप्तीनंतर म्हणजेच, ४ जुलै २००४ रोजी उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद झाले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट असल्याचे मानण्यात आले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २८ जानेवारी २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५५ ची सुधारणा. **२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ५५ मधील, पोट-कलम (१) च्या परंतुकातील, " दोन वर्षांच्या " या मजकुराऐवजी " तीन वर्षांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६५ चा महा. ४०.

सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ याचे निरसन व व्यावृत्ती. **३.** (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४, हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००४ चा महा. अध्या. ९.

(२) अशाप्रकारे अध्यादेश निरसित करण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

## निवेदन

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ५१ द्वारे, एखाद्या नगरपरिषदेच्या अध्यक्षाची निवड त्या नगरपरिषद क्षेत्रातील मतदारांकडून थेट निवडणुकीद्वारे करण्याची तरतूद करण्यात आली आहे. अशा अध्यक्षाची मुदत, नगरपरिषदेच्या मुदतीबरोबर म्हणजेच त्याच्या निवडीच्या दिनांकापासून पाच वर्षांनी संपते. उक्त अधिनियमाच्या कलम ५५ च्या पोट-कलम (१) अन्वये अशी तरतूद करण्यात आली आहे की, अविश्वास ठरावासाठी बोलाविण्यात आलेल्या विशेष सभेमध्ये, एकूण पालिका सदस्यांपैकी तीन-चतुर्थांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांच्या बहुमताने अविश्वासाचा ठराव संमत केल्यास, अध्यक्ष हा अध्यक्ष असण्याचे बंद होईल. तथापि, अध्यक्षाच्या निवडीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीत असा ठराव मांडता येणार नाही, अशी तरतूद या पोट-कलमाच्या परंतुकान्वये करण्यात आली होती.

२. शासनाला, महाराष्ट्र राज्य नगरपरिषदा महासंघ आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून, हा कालावधी वाढविण्यासाठी अभिवेदने प्राप्त झाली होती. ही अभिवेदने विचारात घेतल्यावर, अध्यक्षाच्या पदाला स्थैर्य देण्यासाठी आणि नगरपरिषदांचे काम सुरळीत चालण्याची सुनिश्चिती करण्यासाठी, दिनांक २८ जानेवारी २००४ रोजी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २००४ (सन २००४ चा महा. अध्या. २) प्रख्यापित करून, उक्त कलम ५५ मध्ये सुधारणा करून दोन वर्षांचा उक्त कालावधी तीन वर्षांचा करणे इष्ट वाटले.

३. त्यानंतर माननीय राज्यपालांनी दिनांक १५ मार्च २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन बोलाविले होते आणि राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यानंतर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी दिनांक १७ मार्च २००४ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये सन २००४ चे महाराष्ट्र विधानपरिषद विधेयक क्रमांक १ म्हणून एक विधेयक मांडण्यात आले होते. तथापि, त्याच दिवशी राज्य विधानमंडळाची सत्रसमाप्ती झाल्याने, उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही. शासनास, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात आणण्याचे चालू ठेवणे इष्ट वाटल्यामुळे, १२ मे २००४ रोजी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ प्रख्यापित केला होता.

४. त्यानंतर, २४ मे २००४ रोजी सन्माननीय राज्यपालांनी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन बोलाविले होते आणि राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यावर, उक्त, सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात आला होता आणि उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करण्यासाठीचे विधेयक, २७ मे २००४ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये मांडण्यात आले. उक्त विधेयक ९ जून २००४ रोजी विधानपरिषदेकडून संमत करण्यात आले, परंतू, ११ जून २००४ रोजी उक्त अधिवेशनाची सत्रसमाप्ती करण्यात आल्यामुळे ते विधानसभेकडून संमत होऊ शकले नाही. संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे २००४ चा उक्त अध्यादेश क्रमांक ९, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरण्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांच्या समाप्तीनंतर, म्हणजेच ४ जुलै २००४ रोजी, अंमलात असण्याचे बंद झाले आहे आणि उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे पुढे चालू राहणे इष्ट आहे.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४ (सन २००४ चा महा. अध्या. ९) याच्या तरतुदी चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे. आणि म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित केला आहे.

मुंबई,
दिनांक १२ जुलै २००४.

**मोहम्मद फज़ल,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ना. बा. पाटील,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ५४

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, जुलै १६, २००४/आषाढ २५, शके १९२६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment and Continuance) Ordinance, 2004 (Mah. Ord. XIX of 2004), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRATIMA UMARJI,
Principal Secretary to Government.
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment and Continuance) Ordinance (Mah. Ord. XIX of 2004), published under the authority of the Governor].

---

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 16th July 2004.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XIX OF 2004.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965.*

Mah. Ord.II of 2004. WHEREAS the Governor of Maharashtra had promulgated the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Ordinance, 2004, on the 28th January 2004 ;



[किंमत : रुपये ४.००]

AND WHEREAS upon the re-assembly of the State Legislature on the 15th March 2004, the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Bill, 2004 (L.C. Bill No. I of 2004), for replacing the said Ordinance by an Act of the State Legislature was introduced in the Maharashtra Legislative Council on the 17th March 2004, however, the said Bill could not be passed as the said Session of the State Legislature was prorogued on the same day ;

AND WHEREAS it was considered expedient to continue operation of the provisions of the said Ordinance and therefore the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment and Continuance) Ordinance, 2004 (Mah. Ord. No. IX of 2004) was promulgated by the Governor of Maharashtra on the 12th May 2004 ;

AND WHEREAS upon the re-assembly of the State Legislature on the 24th May 2004, the said Maharashtra Ordinance No. IX of 2004 was laid before both Houses of the State Legislature and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment and Continuance) Bill, 2004 (L. C. Bill No. VIII of 2004), for replacing the said Ordinance by an Act of the State Legislature was also introduced in the Maharashtra Legislative Council on the 27th May 2004, and was passed by the Legislative Council on the 9th June 2004. The said Bill, however, could not be passed by the Legislative Assembly and the Session of the State Legislature was prorogued on the 11th June 2004 ;

AND WHEREAS as provided by article 213 (*2*) (*a*) of the Constitution of India, the said Ordinance No. IX of 2004 has ceased to operate on the expiry of the period of six weeks from the date of re-assembly of the State Legislature, that is, on the 4th July 2004 ; Mah. Ord. IX of 2004.

AND WHEREAS, it is considered expedient to continue the operation of the provisions of the said Ordinance ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature are not in Session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to continue the operation of the provisions of the said Ordinance, for the purposes hereinafter appearing ;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (1) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

**Short title and commencement.** **1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment and Continuance) Ordinance, 2004.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 28th January 2004.

Mah. XL of 1965. **2.** In section 55 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, (hereinafter referred to as " the principal Act "), in the proviso to sub-section (*1*), for the words " two years " the words " three years " shall be substituted. Amendment of section 55 of Mah. XL of 1965.

Mah. Ord. IX of 2004. **3.** (*1*) The Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment and Continuance) Ordinance, 2004, is hereby repealed. Repeal of Mah. Ord. IX of 2004 and saving.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken under the said Ordinance shall be deemed to have been done or taken under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Ordinance.

STATEMENT

Section 51 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 provides for direct election of the President of a Municipal Council by voters of that Municipal Council area. The term of such President is co-terminus with the term of the Municipal Council, *i.e.* five years from the date of his election. Sub-section (*1*) of section 55 of the said Act provides that the President shall cease to be the President if a no confidence resolution is passed by majority of not less than three-fourths of the total number of Councillors at a special meeting convened for the said purpose. However, the proviso to this sub-section provided that such resolution shall not be moved within a period of two years from the date of election of the President.

2. Government had received representations for increasing such period from the Maharashtra State Municipal Councils *Mahasangh* and peoples' representatives, in this behalf. After considering such representations, in order to provide stability to the post of the President and to ensure smooth functioning of the Municipal Councils, it was felt expedient that the said period of two years needed to be made of three years, by amending the said section 55 by promulgation of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Ordinance, 2004 (Mah. Ord. II of 2004), on the 28th January 2004.

3. Thereafter, the session of the State Legislature was convened by the Hon'ble Governor on the 15th March 2004 and upon the re-assembly of the State Legislature, a Bill for converting the said Ordinance into an Act of the State Legislature was introduced in the Maharashtra Legislative Council as L.C. Bill No. I of 2004 on the 17th March 2004. However, the said Bill could not be passed, as the session of the State Legislature was prorogued on the same day. As the Government considered it expedient to continue the operation of the provisions of the said Ordinance, the Mah. Ord. No. IX of 2004 was promulgated by the Governor of Maharashtra on the 12th May 2004.

4. Thereafter, the session of the State Legislature was convened by the Hon'ble Governor on the 24th May 2004 and upon the re-assembly of the State Legislature the said Maharashtra Ordinance No. IX of 2004 was laid before both Houses of the State Legislature and a Bill for converting the said Ordinance into an Act of the State Legislature was also introduced in the Maharashtra Legislative Council as L.C. Bill No. VIII of 2004 on the 27th May 2004. The said Bill has been passed by the Legislative Council on the 9th June 2004, However,

before passing of the said Bill by the Maharashtra Legislative Assembly, the session of the State Legislature was prorogued on 11th June 2004. As the State Legislature had re-assembled on the 24th May 2004, as provided by article 213 (2) (a) of the Constitution of India, the said Ordinance has ceased to operate on the 4th July 2004, and it is considered expedient to continue the operation of the provisions of the said Ordinance ;

5. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exit which render it necessary for him to take immediate action to continue the provisions of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment and Continuance) Ordinance, 2004 (Mah. Ord. IX of 2004), this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 12th July 2004.

MOHD. FAZAL,
Governor of Maharashtra,

By order and in the name of the
Governor of Maharashtra,

N. B. PATIL,
Principal Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई